दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

प्रतिनिधी नेमणे आहे
लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● रविवार दि.३ ऑगस्ट२०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २४८ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये


● Beed (Mahmar) Daily Marathi ● Sunday 3 August 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 248 ● Pages 4 ● Rate 4 Rs

## मुख्यमंत्र्यांच्या अस्मितेला चपराक

# कोठडीतील मृत्यू प्रकरणात अखेर गुन्हा दाखल

## शासन व पोलिसांना हादरा देणारी न्याययात्रा

## ॲड.बाळासाहेब आंबेडकर यांच्या कायदेशीर लढ्याला यश



**परभणी | प्रतिनिधी**

परभणी जिल्ह्यातील नवा मोंढा पोलीस ठाण्यात घडलेल्या कोठडीतील संशयास्पद मृत्यू प्रकरणात अखेर सत्याचा विजय झाला असून, पोलिसांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा लढा केवळ एका आईचा नव्हता, तर संविधानावर विश्वास ठेवून अन्यायाविरोधात उभ्या राहिलेल्या समाजाचा होता. ही घटना १५ डिसेंबर २०२४ रोजी घडली. न्यायालयीन कोठडीत असलेल्या सोमनाथ सूर्यवंशी याचा मृतदेह दुसऱ्या दिवशी मिळाल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली होती. सुरुवातीला पोलिसांनी 'हार्ट अटॅक' असल्याचे सांगत प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला. मात्र मृताच्या आई विजयाबाई सूर्यवंशी यांच्या ठाम आणि निर्भय संघर्षामुळे हा खटला राज्यभर चर्चेचा विषय ठरला. वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी या प्रकरणात सुरुवातीपासून कायदेशीर लढा दिला. त्यांनी या घटनेच्या निषेधार्थ परभणीतून निघालेली न्याययात्रा राज्य सरकार व पोलिस व्यवस्थेला हादरा देणारी ठरली. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे अखेर पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड याच्यासह इतर पोलिसांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.डॉक्टरांच्या शवविच्छेदन अहवालात शॉक ड्यू टू ट्रॉमा असे नमूद करण्यात आले असून, सूर्यवंशी यांच्यावर पोलिसांनी कोठडीत मारहाण केल्याचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत. यासोबतच सीसीटीव्ही फुटेज, पोलीस डायऱ्यांतील नोंदी आणि साक्षींनी पोलिसांवरील



आरोप अधिक बळकट झाले. राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने या प्रकरणात पोलिसांची बाजू घेत कोठडीत कोणतीही मारहाण झाली नाही असे प्रतिज्ञापत्र सादर केले होते. मात्र सर्वोच्च न्यायालयाने ठाम भूमिका घेत, आरोपीचे नाव माहित नसतानाही एफआयआर दाखल होऊ शकतो असे निर्देश दिले. या निर्णयानंतर खझउ कलम १०३(१) अंतर्गत गुन्हा क्रमांक ३४३/२०२५ नुसार अखेर गुन्हा नोंदवण्यात आला. या लढ्यात विजयाबाई सूर्यवंशी यांचा निर्धार विशेष कौतुकास पात्र आहे. मला कोणतीही सरकारी मदत नको, मला पैसा नको; माझ्या मुलाला मारणाऱ्याला फाशी झाली पाहिजे, असे त्यांचे शब्द आज राज्यभरातील अन्याय सहन करणाऱ्या अनेकांना प्रेरणा देत आहेत. या प्रकरणात मुख्यमंत्री, पोलीस यंत्रणा आणि अनेक राजकीय नेते गप्प राहिले, मात्र बाळासाहेब आंबेडकर यांनी हा लढा संविधानाच्या चौकटीत राहून पूर्ण ताकदीने लढवला. हा लढा केवळ न्याय मिळवण्याचा नव्हता, तर पोलिसी अत्याचाराविरुद्ध एक संविधानिक चपराक होती. आज विजयाबाई आणि बाळासाहेब आंबेडकर यांनी दाखवून दिलं आहे की सत्य, संघर्ष आणि संविधान यांच्या जोरावर अन्याय करणाऱ्यांना शिक्षा होऊ शकते.

## वाळू माफियांना दणका: शहादा तालुक्यात महसूल प्रशासनाची धडाडीची कारवाई

### शहादा तालुक्यात अवैध वाळू वाहतुकीवर महसूल प्रशासनाची धडक कारवाई

**नंदुरबार | दिपक गोसावी**

मौजे टेम्भे, तालुका शहादा जिल्हा नंदुरबार येथे महसूल प्रशासनाने ०१ ऑगस्ट २०२५ रोजी पहाटेच्या सुमारास अवैध वाळू वाहतुकीवर मोठी कारवाई केली आहे.

शहादा तहसीलदार यांच्या नेतृत्वाखालील पथकाने पहाटे ४ वाजता विना परवाना वाळू वाहतूक करणाऱ्या एका विना नंबर ट्रॅक्टरवर ही धडक कारवाई केली.

महाराष्ट्र शासनाच्या नवीन वाळू धोरणानुसार, अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश आहेत. याच आदेशाचे पालन करत ही कारवाई करण्यात आली. प्रशासनाने ट्रॅक्टर ताब्यात घेऊन पुढील कायदेशीर कारवाईसाठी पोलीस ठाण्यात अहवाल सादर केला आहे.



महसूल प्रशासनाने यापुढेही अवैध वाळू उपसा आणि वाहतूक रोखण्यासाठी कठोर भूमिका घेणार असल्याचे स्पष्ट केले आहे. या कारवाईमुळे वाळू माफियांमध्ये कायद्याचा धाक निर्माण झाला आहे.

नागरिकांना सहकार्याचं आवाहन:–

अवैध वाळू उपसा आणि वाहतूक ही पर्यावरणाची मोठी हानी असून सार्वजनिक मालमत्तेचा दुरुपयोग आहे. या गैरकृत्यांविरोधात नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन महसूल प्रशासनाने केले आहे. नैसर्गिक संसाधनांचे रक्षण करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचेही या वेळी सांगण्यात आले.

## कर्तव्यदक्ष अधिकारी अनिल अहिरे यांची नायब तहसीलदार पदी पदोन्नती

### पत्नीच्या पाठबळामुळे यशाचा टप्पा गाठला–अनिल अहिरे

**धाराशिव | प्रतिनिधी**

कर्तव्यदक्ष व लोकाभिमुख सेवेसाठी प्रसिद्ध असलेले अनिल अहिरे यांची नुकतीच नायब तहसीलदार पदावर पदोन्नती करण्यात आली आहे. महसुल प्रशासनात कार्यरत असताना त्यांनी कळंब, जागजी, नायगाव व गोविंदपूर या महसूल मंडळांमध्ये अत्यंत जबाबदारीने व निष्ठेने काम केले. त्यांच्या या यशामागे पत्नी सुजाता अनिल अहिरे यांचे मोलाचे सहकार्य असून त्यांनी प्रत्येक टप्प्यावर मानसिक व सामाजिक पाठबळ दिले.

अनिल अहिरे यांना यापूर्वी त्यांच्या कर्तव्यनिष्ठ सेवेसाठी चार वेळा कर्तव्यदक्ष मंडळ अधिकारी म्हणून गौरविण्यात आले आहे. कामाच्या ठिकाणी त्यांनी पारदर्शक प्रशासन, जनतेशी संवाद आणि त्वरित सेवा या मूल्यांचा अवलंब केला. त्यामुळेच सहकाऱ्यांमध्ये व स्थानिक नागरिकांमध्ये त्यांच्याविषयी आदराचे व विश्वासाचे वातावरण आहे.



त्यांच्या या यशाबद्दल जीवन शिक्षण विद्यालय केज व त्यांचे मेव्हणे सहशिक्षक धम्मपाल गायकवाड व परिवार तसेच विविध शासकीय अधिकारी, स्थानिक नेते व ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले असून, पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांच्या पदोन्नतीने धाराशिव महसूल विभागात एक सकारात्मक ऊर्जा संचारली आहे.

## सरकारने गोहत्ये प्रमाणेच शेळी आणि कोंबड्यांची हत्या देखील बंद करावी

### पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांना आश्रय सेवा केंद्राच्या वतीने निवेदन–पत्रकार शेख आयेशा

**मुंबई | प्रतिनिधी**

सरकारने गोहत्ये प्रमाणेच शेळी,मेंढी,कोंबड्यावर अन्य कोणत्याही जिवाची हत्या देखील बंद करण्या बाबत कठोर कायदा लागू करून त्यांचे जीव देखील वाचवावते अशी मागणी पर्यावरण मंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे यांना रामटेक शासकीय निवासस्थानी प्रत्यक्ष भेट घेऊन करण्यात आली असल्याचे पत्रकार शेख आयेशा यांनी सांगितले.



निवेदनात पुढे म्हटले आहे की, महाराष्ट्रामध्ये गोहत्या बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या निर्णयाच्या अनुषंगाने मुस्लिम समाजाने मागील काही दिवसापासून आपली कत्तलखाने बंद केलेली आहेत. गोमास विक्री आणि खरेदी बंद असून जनावरांची कत्तल करणे देखील बंद केलेले आहे.आता महाराष्ट्र सरकारने गोमास हे जसे खरेदी आणि विक्री बंदचा निर्णय घेतला आहे त्याच प्रकारे मांस म्हणून आहारात वापरण्यासाठी शेळी, मेंढी, कोंबड्या, चित्तर आदिंसह काही वन्य प्राणी व पक्षी यांचा देखील सर्रास वापर करत आहेत. त्यांना देखील जीव असल्याने महाराष्ट्र सरकारने गोहत्या प्रमाणेच शेळी, मेंढी, कोंबड्या, चित्तर अथवा अन्य कोणत्याही जीव प्राण्यांची हत्या बंदी करण्याचा निर्णय कायदेशीर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब तसेच महाराष्ट्र सरकारला पर्यावरण मंत्री म्हणून आपण पुढाकार घ्यावा अशी निवेदनाद्वारे प्रत्यक्ष ताईसाहेबांना मुंबई येथील रामटेक शासकीय बंगल्यावर भेट घेऊन मागणी केली असल्याचे पत्रकार तथा आश्रय सेवा केंद्राच्या अध्यक्षा शेख आयेशा यांनी सांगितले.

## जिव्हाळ्याच्या सोनाबाई शेंडगे यांनी अखेरचा श्वास घेतला

## जिव्हाळा परिवाराकडून आज पर्यंत निराधार,अनाथ बेघर यांचा हा ३३ वा अंत्यसंस्कार पार पडला

**बीड | प्रतिनिधी**

अनेक दिवसापासून कधी रोडच्या कडेला तर कधी शासकीय रुग्णालयाच्या वरांड्यात मागील तीन महिन्यापासून सोनाबाई शेंडगे जवळपास ९० वर्षाच्या आजीबाई शेवटच्या क्षणाची वाट पाहत असायच्या. अंगावरील कपडे अस्त व्यस्त असायचे जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य व व्यवस्थापन राजू वंजारे काळजीवाहक व्यवस्थापिका छाया सरोदे टीमने निवारा केंद्रामध्ये आजीबाईंना निवारा देत संभाळ केला.आजारी पणात अनेकदा त्यांना शासकीय रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले होतो. शेवटी आज दि.



१ ऑगस्ट २०२५ रोजी उपचार घेत असताना पहाटे २ वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला. जिव्हाळा केंद्राच्या टीमने आजीबाईचा अंत्यसंस्कार आज दुपारी ३ वाजे च्या दरम्यान भगवान बाबा प्रतिष्ठान स्मशानभूमी मध्ये करण्यात आला. छाया सरोदे व कस्तुरा भोजपुरी, मसूर भोजपुरी यांच्या हस्ते आजीबाईंना अग्नी देण्यात आला. यावेळी जीव्हाळा बेघर निवारा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य ,व्यवस्थापक राजू वंजारे, काळजीवाहक व्यवस्थापिका छाया सरोदे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ.संजय तांदळे ,भोजपुरी मसूर, आजीबाई च्या बहीण प्रयागबाई शेटे, क्षितिज शेटे आदींची अंत्यविधीला उपस्थिती होती.जिव्हाळा परिवाराकडून आज पर्यंत निराधार,अनाथ,बेघर यांचा हा ३३ वा अंत्यसंस्कार पार पडला.

संपादकीय

# 'लाडक्यां'चा घोटाळा



राज्यात लोकप्रिय आणि गेमचेंजर ठरलेली 'लाडकी बहीण योजना' सध्या एनकेन कारणाने वादात आहे. ही सरकारी योजना केवळ महिलांसाठी असली तरी त्याचे लाभार्थी चक्क पुरुष असल्याचे उघड झाल्याने, 'आता काय बोलणार!' असा प्रश्न निर्माण झाला. लाडकी बहीण योजनेचे निकष डावलून लाभ घेणाऱ्या पुरुष लाभार्थी संख्या थोडीथोडकी नाही, तर सुमारे १४ हजारांपेक्षा अधिक आहे!, त्या जोडीला दोन हजारांपेक्षा अधिक सरकारी नोकरदार महिलांनी या योजनेतून दरमहा दीड हजार रुपये कमावले आहेत. राज्य सरकारच्या नोकरीत काम करणाऱ्या चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांचे वार्षिक उत्पन्न सरासरी चार लाख रुपयांपेक्षा अधिक आहे. या योजनेसाठी अडीच लाखांपेक्षा कमी उत्पन्नाची अट असतानाही, महिला सरकारी कर्मचाऱ्यांनी लाभ कसा घेतला? हा आता पडताळणीचा भाग झाला आहे. या सरकारी नोकरदार महिलांकडून पुन्हा पैसे घेणार? त्यांच्यावर कारवाई होणार का? हे प्रश्न अद्याप अनुत्तरीत आहेत. या योजनेचे आतापर्यंत ज्यांच्या बँक खात्यात पैसे जमा झाले, अशा एकूण २ कोटी ३४ लाख महिला लाभार्थी आहेत. योजनेच्या नावाखाली सरकारी पैशांचा गैरवापर झाल्याची अनेक प्रकरणे उघडकीस आली. त्याचे अनेक किस्से कानावर पडतात. राज्य सरकारने सर्व अर्जांची छाननी सुरू केल्यानंतर जून महिन्यांपर्यंत २६ लाख महिलांचा लाभ तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्याचा निर्णय सरकारने घेतला. वार्षिक अडीच लाखांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबातील महिलांनाच यापुढे लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळणार आहे, असे मंत्री अदिती तटकरे यांनीही स्पष्ट केले आहे. त्यासाठी राज्य सरकारने आयकर विभागाकडून माहिती मागवून अर्जांची छाननी सुरू केली आहे. चारचाकी वाहने असणाऱ्या महिलांच्या अर्जांची परिवहन विभागाची मदत घेत पडताळणी होत आहे. काही लाभार्थी एकापेक्षा जास्त योजनांचा लाभ घेत असल्याचे तर काही कुटुंबांमध्ये दोनपेक्षा जास्त लाभार्थी असल्याचे निदर्शनास आले आहे. अनेक महिला लाभार्थींबाबतीत असे आढळून आले आहे, की आधार कार्डावर नाव वेगळे तर बँकेत नाव वेगळे आहे, अशा अर्जांची पडताळणी सुरू आहे.

दुसऱ्या बाजूला 'लाडकी बहीण योजनेच्या नावाने परराज्यातील टोळीकडून फसवणूक केली गेल्याचा प्रकारही समोर आला आहे. मुंबईतील जुहू पोलिसांनी एका दांपत्यासह ४ जणांवर नुकताच गुन्हा दाखल केला. गुजरातमधील एक मोठी टोळी नागरिकांच्या नावाने बनावट खाती उघडून त्यांच्या खात्यावरील योजनांचे पैसे लुबाडत असल्याचे तपासात उघड झाले. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात विविध नागरिकांची बँक खाती आणि इतर साहित्यांची कागदपत्रे पोलिसांनी जप्त केली. लाडकी बहीण योजनेच्या नावाने सर्वसामान्य नागरिकांची बँक खाती तयार करून त्यांचा सायबर गुन्ह्यांसाठी वापर केला गेला. लाडकी बहीण योजना महिलांसाठी असली तरी, आरोपींनी तयार केलेली बहुतांश बँक खाती पुरुषांची असल्याची बाब उघड झाली आहे. पोलिसांनी तपासात १०० हून अधिक बनावट खाती बंद करून सरकारच्या तिजोरीतून जाणारी १९ लाखांहून अधिक रक्कम थांबवण्यात यश मिळविले, ही चांगली बाब म्हणावी लागेल. एकूण छाननीनंतर अपात्र महिलांची संख्या वाढणार, हे निश्चित. सरकारच्या आवाहनानंतर साडेचार हजार महिलांनी स्वत:हून अर्ज करून या योजनेतून आपली नांवे काढून घेतली. त्यामुळे या महिला सुरुवातीला मिळालेले पैसे परत करतील का? हा मोठा प्रश्न आहे. या योजनेअंतर्गत अपात्र लाभार्थींच्या खात्यावर गेलेले पैसे हे सर्वसामान्य करदात्यांच्या पैशांचा अपव्यय आहे, असे प्रश्न जनतेतून उपस्थित केले जात असल्याने राज्य सरकारने योजनांची अंमलबजावणी करताना किती काळजी घ्यायला हवी, ही गोष्ट अधोरेखित होते.तळागाळातील सर्व घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाकडून विविध योजना जाहीर केल्या जातात. 'कल्याणकारी राज्य' या संकल्पनेवर शासनाचा कारभार चालतो. या विविध योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपासून समाजातील वंचित घटकांना मिळवून देण्यासाठी शासनाकडूनही तसे प्रयत्न केले जातात. विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेतल्याने आदिवासी घटकांपासून गरीब वर्गातील व्यक्तींना आतापर्यंत त्याचा फायदा झाला आहे.मात्र, योजनेतील लाभार्थी जर सरकारची फसवणूक करत असतील, तर दोष कोणाला द्यायचा? आपल्या घरातील तिजोरीतील रक्कम गरजूला दान द्यायची असेल, तर किती विचार करतो? आपण ती रक्कम योग्य व्यक्तीला मिळणार नाही याची खातरजमा करतो. आता सरकारी तिजोरीतून जाणारी रक्कम चुकीच्या व्यक्तींच्या खात्यावर जात असेल तर, ते वेळीच रोखायला हवे. सरकार म्हणजे 'बाप का माल' ही मानसिकता रूजू होऊ लागली आहे. लाडकी बहीण योजनेतील अपात्र लाभार्थींची लाखोंची संख्या हे त्याचेच द्योतक आहे. महायुती सरकारने गरीब घरातील बहिणींना आर्थिक हातभार मिळावा यासाठी सुरू केलेल्या योजनेसाठी कोणते निकष आहेत हे आधीच जाहीर केले होते. तरीही, गर्भश्रीमंताच्या वस्तीत फ्लॅटमध्ये राहणाऱ्या, कुटुंबाच्या नावावर चारचाकी वाहने असणाऱ्या महिलांनी या योजनेसाठी अर्जच का करावेत, हे नैतिकतेच्या आधारावर ही मोठी चूकच होती, याची जाणीव या महिलांना नक्कीच असेल. सरकारी योजना म्हणजे ओरबडून घ्यायची प्रवृत्ती नको. बोगस लाभार्थींचा टिळा आपल्या कपाळी नको याचे भान सर्व सजग नागरिकांनी ठेवायला हवे.

# परिवर्तनाचा साक्षीदार : पत्रकार उत्तम हजारे



तब्बल दीड डझन दैनिकांत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पत्रकारितेचा अनुभव घेतलेले बीड येथील ज्येष्ठ पत्रकार व आमचे मित्र उत्तम हजारे यांच्या वाढदिवसानिमित्त( दि.२ ऑगस्ट ) मुक्तचिंतन

पत्रकारितेचे माझे शिक्षण व प्रशिक्षण संपल्यानंतर पहिली नोकरी मिळाली ती लोकमत बीड कार्यालयात. माझा हाच जिल्हा असल्यामुळे ईथल्या राजकीय -सामाजिक चळवळीची माहिती बर्यापैकी होती. बीडमध्ये आठ वर्षे पत्रकारिता करीत असताना ज्या काही पत्रकार मित्रांशी स्नेहबंध जोडले गेले अशापैकी एक असलेले उत्तम हजारे. लोकाशाच्या बीड जिल्हा आवृत्तीचे प्रमुख म्हणून सध्या ते कार्यरत आहेत. आज उत्तमभाऊचा वाढदिवस, या निमित्ताने झुंजार पत्रकार मित्राविषयी हा शब्द प्रपंच..

फुले -शाहू -आंबेडकरी विचारांची शिदोरी सोबत घेऊन गेल्या अडीच दशकांपासून ते माध्यम क्षेत्रात कार्यरत आहेत. पत्रकारितेच्या या प्रवासात सध्या लोकाशा परिवारात ते चांगलेच रमले आहेत. लोकाशा परिवारातील हा त्यांचा दुसरा वाढदिवस. समाजाभिमुख पत्रकारितेचे एक वर्तुळ पूर्णत्वास जाताना आज दिसत आहे. नवाकाळ, पुढारी, पुण्यनगरी, झुंजार नेता, सम्राट आदी दैनिकात त्यांनी पत्रकात त्यांनी विविध पदावर कामे केली आहेत. अग्रलेखाचे बादशहा मा. निळूभाऊ खाडिलकर, पदमश्री डॉ. प्रतापसिंह जाधव, मुरलीधर बाबा शिंगोटे, मोतीराम वरपे, बबन कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांची पत्रकारिता बहरली. या दैनिकांमध्ये केवळ बीडच नव्हे तर मराठवाडयाची बातमीदारी करायची संधी त्यांना मिळाली. आठ- दहा वर्षे बीड येथूनच मराठवाडयातील आठही जिल्हयातील प्रश्न पुढारी व नवाकाळमधून त्यांनी मांडले. या दैनिकांशी आजही त्यांचा स्नेह कायम आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना मराठवाडा, लोकमत, चंपावतीपत्र, रिपोर्टर, सिदंफणा, पार्श्वभूमी, सोलापुर संचार, नगर सार्वमत यासह विविध दिवाळी अंकात साहित्य व विविध सदरात त्यांनी लेखन केले. अगदी सुरुवातीच्या काळात ज्येष्ठ संपादक नरेंद्र कांकरिया यांच्या संकेत व परळीच्या मराठवाडा साथी दैनिकात शिकाऊ पत्रकारिता केली. मुंबईतील एक वर्षाच्या काळात मुंबईतील विविध दैनिकाशी त्यांचा सबंध आला.

तब्बल पंचवीस वर्ष म्हणजेच १९९५ पासून आजपर्यंत जनतेसाठी पत्रकारिता त्यांना करता आली. माध्यमे बदलती, पत्रकारितेची साधने बदलली, कोरोना-लॉकडाऊन काळात पत्रकारिता व माध्यमे संकटात आली. आता डिजीटल माध्यमाचे युग आहे, या युगातही प्रिंट मिडीया हाच विश्वास पात्र आहे, हे नव्याने सिद्ध करण्याची वेळ आली आहे. अशा वेळी अनेक दैनिकात आलेला अनुभव पाठिशी घेत लोकाशाचे मुख्य संपादक तथा समाजभूषण विजयराज बंब यांच्या मार्गदर्शनाखाली ती कार्यरत आहेत. लोकाशा ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक रोशन बंब यांनी दिलेली जबाबदारी ते पार पाडीत आहेत. पत्रकारितेच्या माध्यमातून जनसामान्याचे हित आपली जात झाले यासाठी कार्यरत राहिले आहेत. बीड जिल्ह्यातील ऊसतोड मजुरांचा प्रश्न रेल्वेचा प्रश्न यासह असंख्य विषयांवर त्यांनी वृत्तमालिका लिहिलेल्या आहेत. ज्या लोकशा दैनिकाचे बीड जिल्हा निवासी संपादक प्रति सांभाळत आहेत याचा मी संस्थापक राहिलेलो आहे. माझा सहकारी संतोष जोगदंड हा उत्तम आणि मला जोडणारा दुवा आहे. तर बंब साहेब म्हणजे अत्यंत दिलदार व मोठ्या मनाचा माणूस आहे. त्यांच्यासोबत दोन वर्ष मला व्यवसायिकता, धाडस व चिकाटी हे गुण शिकता आले. बंब साहेब दररोज कार्यालयात आले काय 'प्रॉलेम' आहे, असे म्हणत असत. 'प्रॉब्लेम'चा साठी त्यांचा हा खास शब्द. शब्दाचा सोडा मात्र जगातील कुठलाही प्रॉब्लेम आला तर ते सोडवण्यासाठी लागणारा पैसा आणि धाडस या दिलदार माणसाकडे असल्याचे मी जवळून अनुभवले आहे. पत्रकारितेत शब्दांपेक्षाही आकड्यांना जास्त महत्त्व असते हे मला कळून चुकले. उत्तम हजारे यांनी बंब साहेबांची साथ प्रामाणिकपणे निभवावी. यातच त्यांची प्रगती आहे असे आम्हा मित्रांना वाटते. यातच त्यांचे सौख्य सामावलेले आहे.

परिवर्तनवादी विचारधारा हा त्यांचा वसा आहे आणि वारसा आहे. परिवर्तन या शब्दात 'वर्तन' देखील समाविष्ट असते याची जाणीव त्यांनी विसरता कामा नये. तर अशा या पत्रकार मित्राने शिरसमार्ग (ता. गेवराई) येथून सुरू केलेली वाटचाल आज वयाच्या पन्नाशीत पोहोचली आहे. पत्रकारीतेची पंचविशी अर्थात रौप्य महोत्सव पूर्ण झाला आहे. एक मुलगा डॉ. सुजित हजारे हा मेडीकल ऑफीसर झाला आहे तर दुसरा नोबेल हजारे हा तैवान देशात उच्च शिक्षण घेत आहे .

पत्रकार म्हणून फार मोठा पैसा नाही मिळविता आला मात्र नावलौकिक खूप कमावला आहे. अन्य मंडळीप्रमाणे लुच्चेगिरी अन् हुजेरीगिरी उत्तमच्या रक्तातच नाही. काही मंडळींनी तर नेत्यांच्या मागे पुढे फिरून अन् अधिकाऱ्यांची दलाली करून चांगला जमिनी - जुमला कमावला आहे. जुमलेबाजी करणे ऊत्तमला कधीच जमले नाही.

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला स्वाभिमानाचा विचार हा त्यांचा श्वास आहे आणि ध्यासही.

अशाप्रकारे स्वत:सोबत समाजाचे परिवर्तन घडण्याची क्षमता असणाऱ्या या पत्रकार मित्राला वाढदिवसाच्या मन:पूर्वक शुभेच्छा. या निमित्ताने तुमच्या अत्यंत कष्टमय जीवनाची वाटचाल म्हणताना शेवटी मजरूह सुल्तानपुरी यांच्या ओळी मला आठवत आहेत...

**मैं अकेला ही चला था**
**जानिब-ए-मंज़िल मगर,**
**मगर लोग साथ आते रहे**
**और कारवाँ बनता गया...**

**संजय शिंदे/मुक्तसंवाद**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर**
**मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर,**
**मोबा-९५७९०४४११५**

# शाळेचं शिक्षण झोडपाटीत हरवलं; धारूरच्या गुरु लिपिक तमाश्यानं शिक्षणसंस्थेची झोप उडवली!

## 'गुरुजीं'ना राग आवरत नाही, की 'लिपिक'ला शाळा वाटते बापाची जागा?

**बीड । लोकपत्रकार भांगे**

शाळा म्हणजे संस्कारांचं मंदिर, ज्ञानाचं दैवत. पण धारूरमधील सरस्वती प्राथमिक विद्यालयात जे घडलं ते पाहता, शिक्षक आणि लिपिक या दोघांनी मिळून त्या मंदिराचं वेशीवरच उष्टं अन्न ठेवून टाकल्यासारखं वाटतं.१ ऑगस्ट रोजी सकाळी ११.३० च्या सुमारास अंगणात पाणी टाकण्यावरून सुरू झालेलं किरकोळ भांडण शाळेच्या गेटवर मारहाणीत रूपांतरित झालं. शिक्षक विजय चुधार आणि लिपिक प्रदीप शेटे या दोघांनी शाळेच्या शिस्तीचा चक्काचूर करत, विद्यार्थ्यांपुढे रिंगणात उतरावं तसं वागणूक दिली. शाळेतील सीसीटीव्हीने साक्ष दिली आणि समाजाने थरकाप खाल्ला.शिक्षक हा विद्यार्थ्यांचा मार्गदर्शक असतो, पण चुधार सरांनी संयम सोडून वाद पेटवण्याचं कर्तृत्व दाखवलं. वाद टाळणं सोडून त्यांनी तो चिघळू दिला, की आपली पदवी 'क्रांतीकारक शिक्षक' अशी ठरवायची ठरवलं होतं? विद्यार्थ्यांसमोर आपली तडफ दाखवणं हे शिक्षणाचं नव्हे तर अहंकाराचं दर्शन आहे.आणि दुसरीकडे लिपिक शेटे... शाळेच्या पगारावर राहून बाहेरून लोक बोलावून



शिक्षकावर हात उचलायला लावणं म्हणजे कुठल्या नियमानं चालतं? शिक्षकेत्तर कर्मचारी की स्थानिक गुंडगिरीचा शाखा प्रमुख?लिपिकपद म्हणजे काय, स्वतःचा गट तयार करून शाळेतील प्रशासनावर ताबा मिळवायचं प्रमाणपत्र?या दोघांनी मिळून विद्यार्थ्यांच्या मनात शाळेचं पहिलं पवित्र चित्र काळवंडून टाकलं. शिक्षणात दहशतीचं आणि द्वेषाचं विष पेरलं. आता प्रश्न फक्त मारहाणीचा नाही, तर संपूर्ण शाळा संस्कृतीचा आहे.या घटनेनंतर केंद्रप्रमुख हरीनी हुक्मी यांनी शाळेला भेट देऊन चौकशी सुरू केली आहे. मुख्याध्यापक डोगरे यांनीही वरिष्ठ कार्यालयाला तातडीने कळवले असून पोलीस कारवाई सुरू आहे. मात्र हे पुरेसं नाही.या प्रकारावर केवळ चौकशी, समजूत किंवा योग्य ती कारवाई होईल असे जुने ठोकताळे चालणार नाहीत. या प्रकारातील दोन्ही दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई झालीच पाहिजे. शिक्षक असो वा लिपिक, पवित्र शिक्षण संस्थेत राडा करणाऱ्या कोणालाही सवलत नको!शाळा रिंगण नव्हे आणि शिक्षक-लिपिक हे रिंग मास्टर नव्हेत. शासनाने, शिक्षण विभागाने या घटनेचं गांभीर्य लक्षात घेऊन एकदाच असा बडगा उगारावा, की पुढे शाळा म्हणजे 'संस्कारांची शाळा' राहील... 'भांडकुदळांचा आखाडा' नाही!

# संजय आंधळेंचा उपक्रम गावागावात पोहोचला पंकजाताईंना मिळतोय ३ हजार विद्यार्थ्यांचा आशीर्वाद!

## कोयत्याऐवजी पेन संजय आंधळे यांचा शिक्षणाला हातभार सप्ताहाची सांगता



**बीड । लोकपत्रकार भांगे**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण व्हावी उद्देशाने वडवणी तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील ३ हजार विद्यार्थ्यांना ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त २१ हजार वह्यांचे वाटप करण्यात आले असून या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शालेय जीवनात आवश्यक असणारे साहित्य मोफत मिळाल्याने त्यांचा आत्मविश्वास व अभ्यासातील रुची वाढेल, आणि या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील हजारो चिमुकल्या विद्यार्थ्यांचा आशीर्वाद ना. पंकजाताई मुंडे यांना लाभेल असे मत टोकेवाडी येथील शैक्षणिक,पर्यावरण सप्ताहाच्या सांगता कार्यक्रमात भाजपचे युवा नेते संजय आंधळे यांनी व्यक्त केले आहे.

महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण, वातावरणीय बदल मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त वडवणी तालुक्यातील २५ गावे, बारा वाड्या आणि सहा तांडे येथील ५५ जिल्हा परिषद शाळांमध्ये भव्य शालेय साहित्य वाटप उपक्रम राबविण्यात आला असून या उपक्रमांतर्गत एकूण ३ हजार विद्यार्थ्यांना २१ हजार वह्या व विविध शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले आहे. तसेच ५०० गरजु विद्यार्थ्यांना स्कूल बॅग्स , दोन हजार कापडी पिशव्या देखील वितरित करण्यात आल्या आहेत. ५ हजार वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. या शैक्षणिक,पर्यावरण सप्ताहाची सुरुवात दि.२६ जुलैपासून करण्यात आली होती. याची सांगता दि.२ ऑगस्ट रोजी सांगता टोकेवाडी येथे करण्यात आली. शैक्षणिक,पर्यावरण सप्ताहाला गावोगावी अभुतपुर्व प्रतिसाद मिळाला असुन शाळकरी मुलांमध्ये आनंदाचे वातावरण असून विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. पालक वर्गाकडून या उपक्रमाचे कौतुक होत आहे. शिक्षणावरील ना.पंकजाताईंची सामाजिक बांधिलकी या उपक्रमातून प्रकर्षाने दिसून आली. पुढे बोलताना आंधळे म्हणाले की, लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब म्हणाले होते की, ग्रामीण भागातील ऊसतोड मजुरांच्या मुलांच्या हातातील कोयता सोडवुन त्यांच्या हातात पेन द्या, ग्रामीण भागातील मुले शिकली पाहिजेत, म्हणून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य उज्ज्वल व्हावे म्हणून हा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी गोडी निर्माण होणार असून, त्यांच्या शैक्षणिक गरजांना हातभार लागणार असुन याच्या माध्यमातून ग्रामीण भागातील चिमुकल्या विद्यार्थ्यांचा आशिर्वाद ना.पंकजाताई मुंडे यांना लाभेल. आणि हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मकता व पुढे जाण्याची प्रेरणा नक्कीच निर्माण करेल. ग्रामीण भागातील शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी तुम्ही हाक द्या आम्ही साथ देऊ. आणि भविष्यात ही शाळेच्या मदतीसाठी धावून येऊ असे आंधळे म्हणाले, शेवटी म्हणाले की, ना.पंकजाताईंचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने अविरतपणे साजरा करत राहणार असल्याचे मत भाजपा नेते संजय आंधळे यांनी व्यक्त केले आहे. यावेळी शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी ना. पंकजाताई मुंडे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी सप्ताहाचे आयोजक भाजपा नेते संजय आंधळे , भाजपा तालुकाध्यक्ष सुखदेव रेडे,कृ.उ.बा. संचालक डॉ.रोहीदास खोटे, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष ईश्वर तांबडे, सरपंच संतोष कदम , चेअरमन गोरख यादव, सुशील कदम,पंडित यादव, अनिरुद्ध चिलगर, गोरख डोंगरे,बालासाहेब कदम, रामेश्वर कदम, श्याम यादव, सरपंच अशोक चोले, अभिमान दराडे, अशोक दराडे, बाबासाहेब चोले, अप्पा दराडे, अंगद खराडे, महादेव खराडे, वैजनाथ डोंगरे, उत्तम केकाण, सचिन केकाण, विलास चोले, सूर्यकांत चोले, छबू चोले, सुभाष राकुसले, राम डोंगरे,सह शिक्षक, गावकरी व विद्यार्थी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून गुरु आनंदच्या सीमा ओस्तवाल यांनी आण्णाभाऊंची जयंती साजरी केली-जयश्री विधाते

**बीड । प्रतिनिधी**

लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे, व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून गुरु आनंद महिला प्रतिष्ठान बीड आणि प्रयास फाउंडेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने जि.प.प्राथमिक शाळा पोलीस कॉलनी बीड येथे मोफत शैक्षणिक साहित्य वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून मैना बोराडे माजी उपशिक्षणाधिकारी जिल्हा परिषद बीड. तसेच प्रमुख अतिथी म्हणून बीड नगरपालिकेच्या माजी सभापती तथा नगरसेविका जयश्री विलास विधाते शिक्षण विस्तार अधिकारी राजेंद्र खेडकर, केंद्र प्रमुख लक्ष्मीकांत अवढाळ, पंचायत समिती बीड उषा लोंढे, एकल महिला संघटनेच्या रुक्मिणी नागापुरे, राखीव दलाचे. पो. निरीक्षक पोलीस मुख्यालय बीड पी.पी.दलाई,संतोष जायभाय,दै.वादळवार्ताचे कार्यकारी संपादक बालाजी जगतकर, सुजाता सावंत,दैनिक दिव्यलोक भूमीचे केशव मुंडे, न्यू २३ मराठीचे संपादक गणेश शिंदे,संपादक युवादर्पण लाईव्हचे राजेंद्र तिडके, संतोष जायभाय,सविता जैन,रवि धोंडगे मुख्याध्यापक सुमित जोगदंड, कार्यक्रमाच्या आयोजक समाजसेविका सीमा ओस्तवाल यांची उपस्थिती लाभली होती.

या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात खवचट सर यांनी केले तर शाळा आणि सेवाभावी संस्था यांच्या माध्यमातून आजवर राबवण्यात आलेल्या उपक्रमांचा ओघवता आढावा घेतला. तर कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी माजी सभापती तथा नगरसेविका जयश्री विलास विधाते यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकत पौराणिक काळ ते स्वातंत्र्यपूर्व काळात स्पृश्य अस्पृश्यतेच्या जोखडात अडकलेला एकलव्याला धनुर्विद्या नाकारणारा गुरु द्रोणाचार्य तर स्वातंत्र्यपूर्व काळात स्पृश्य अस्पृश्यतेची जाणीव करुन देत छडी फेकुन मारणारा शिक्षक ते आज प्राथमिक शिक्षण हा प्रत्येक बालकाचा अधिकार आहे आणि तो त्यांना मिळवून देण्यासाठी तांडा वाडी वस्ती झोपडपट्टी ते गाव कुसाबाहेर शाळा प्रवेशासाठी उपेक्षित वंचीत दीन दुबळ्याच्या लेकरांना प्रेरित करणारा जि.प.चा आजचा शिक्षक हे परिवर्तन म्हणजे जग बदल घालून घाव, सांगून गेले मज भीमराव. या आण्णाभाऊंच्या लेखणीची ताकद आहे. असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या आयोजक समाजसेविका सीमा ओस्तवाल यांनी विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधत त्यांना बोलक केल. मोबाईल पासुन दुर रहा, चांगला अभ्यास करा. आणि मोठे व्हा.आपली ओळख आपल्या कामाच्या माध्यमातून झाली पाहिजे असे काम करा अशा शुभेच्छा दिल्या. उषा लोंढे यांनी प्रत्येक शाळेत महापुरुषांचे फोटो असायला पाहिजेत त्याच बरोबर प्रत्येक महापुरुषाची जयंती साजरी केली पाहीजे. त्यांचे जीवन चरित्र विद्यार्थ्यांना उलगडून सांगीतले पाहिजे अशी आपेक्षा व्यक्त केली. मैना बोराडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून शाळेला ई-क्लास रुम मिळावी यासाठी प्रयत्नशील असल्याची ग्वाही दिली.



या कार्यक्रमात कें.प्रा. शाळा पोलीस कॉलनी, कें. प्रा.शाळा इंदिरानगर, कें. प्रा. शाळा धोंडीपुरा. कें. प्रा. शाळा शाहुनगर बीड या शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या, पेन्सिल,ईरेझर,शार्पनर अशा शैक्षणिक साहित्य वाटण्यात आले. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी बालमित्र मोठ्याप्रमाणात उपस्थित होते.

## संघर्षमय सेवेला सलाम;लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त

# जिव्हाळा बेघर निवारा केंद्राच्या कार्यकर्त्यांचा नागरी गौरव

**बीड । प्रतिनिधी**

संघर्ष हा जगण्याचा श्वास असतो आणि सेवा हेच खरे आयुष्य!..साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरात घडलेला एक प्रसंग हा केवळ कार्यक्रम नव्हता, तर तो होता संघर्षशील सेवेला दिलेला एक भावनिक सलाम!उत्कर्ष मोमीन,रोहित चव्हाण आणि युवाशक्ती मित्र मंडळ, बीड यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या विशेष कार्यक्रमात सुप्रसिद्ध लोकगायिका कडूबाई खरात यांनी सादर केलेल्या जाज्वल्य लोकगीतांनी उपस्थित हजारो नागरिकांच्या हृदयाला हात घातला. अण्णाभाऊंच्या विचारांची आणि कष्टाची आठवण त्यांच्या सूरांनी जागवली.

या कार्यक्रमात जिव्हाळा बेघर निवारा केंद्र या संस्थेच्या निस्वार्थ सेवेला मानाचा मुजरा देण्यात आला. संचालक अभिजीत वैद्य, व्यवस्थापक राजू वंजारे आणि



काळजीवाहक छाया सरोदे यांच्या अथक प्रयत्नांची दखल घेऊन त्यांना शाल, पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन नागरी सन्मान प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमस्थळी टाळ्यांच्या कडकडाटात, डोळ्यांतून ओघळणाऱ्या अश्रूंनी या गौरवक्षणाला अधिकच पवित्रता दिली. हा केवळ सत्कार नव्हता तो होता रात्री अंधारात झोपडपट्टीत चूल पेटवणाऱ्या हातांचा सन्मान, उपेक्षितांच्या डोळ्यात उजेड पेरणाऱ्या माणसांच्या संघर्षाचा गौरव!या गौरवसोहळ्याच्या निमित्ताने जिव्हाळा संस्थेला मिळालेला 'साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुरस्कार', मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्राप्त झाल्याचा आनंदही बीडकरांनी मोठ्या अभिमानाने साजरा केला. या गौरवक्षणाचे साक्षीदार ठरले माजी नगरसेवक शुभम धूत, मोमीन, रोहित चव्हाण आणि अनेक मान्यवर.अण्णाभाऊंचे विचार म्हणजे शोषितांसाठी न्यायाची मशाल. जिव्हाळा संस्थेचे कार्यकर्ते ही मशाल घेत समाजाच्या अंधाऱ्या गल्ल्यांमध्ये आशेचा उजेड पेरतात हेच म्हणावे लागेल!

# लहुजी शक्ती सेना महिला जिल्हाध्यक्ष प्रियांका ताई लांडगे यांना राष्ट्रीय गौरव पुरस्कार जाहीर

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याच्या सामाजिक कार्यक्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या लहुजी शक्ती सेनेच्या महिला जिल्हाध्यक्ष तथा राज्य कार्यकारिणी सदस्य प्रियांका ताई लांडगे यांना राष्ट्रीय गौरव पुरस्कार २०२५ जाहीर झाला आहे. हा पुरस्कार साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त प्रदान करण्यात येणार असून, सार्वजनिक जयंती उत्सव समिती २०२५ नवी दिल्ली यांच्या वतीने अत्यंत मानाचा व प्रतिष्ठेचा गौरव म्हणून दिला जाणार आहे.



प्रियांका लांडगे यांच्यासह सामाजिक चळवळीत सातत्याने कार्य करणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनाही यंदा गौरवण्यात येणार आहे. सामाजिक समतेसाठी लांडगे यांनी केलेली भरीव कामगिरी, महिलांच्या न्यायहक्कासाठी घेतलेला आवाज आणि वंचित घटकांच्या हक्कांसाठी दिलेल्या लढ्याची दखल राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली आहे.

हा पुरस्कार दिनांक ५ ऑगस्ट २०२५ रोजी, इंडिया गेटजवळील नवीन महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथे होणाऱ्या भव्य कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्कार वितरण सोहळ्यास केंद्रीय मंत्री, विविध साधूसंत, मान्यवर अतिथी, तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे निलेश गद्रे प्रमुख उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष विनोद धर्म जाधव यांनी दिली.

या गौरवामुळे बीड जिल्ह्यातून सामाजिक कार्यात कार्यरत असलेल्या इतर कार्यकर्त्यांनाही प्रोत्साहन मिळणार असून, लांडगे यांच्या या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# खांडे पारगाव येथे महाराष्ट्र आधार सेनेचे शाखा उद्घाटन थाटात संपन्न

## अठरा पगड जाती धर्माच्या जन सेवेसाठी कटिबद्ध-दीपक थोरात

**बीड । प्रतिनिधी**

ना जातीचा न धर्माचा एक हात मदतीचा उल्लेखनीय कार्य असलेल्या महाराष्ट्र आधार सेनेच्या नव्याने स्थापन करण्यात आलेल्या संघटनेचे नावलौकिक कार्य आहे त्यांची आरोग्य सामाजिक राजकीय क्षेत्रामध्ये या अगोदरच वेगळी ओळख आहे बीड जिल्ह्यामध्ये जेव्हा ग्रामीण भागातून माणूस येतो तेव्हा त्यांच्या मदतीसाठी धावून जाणारा माणूस कोणी असेल तर फक्त दिपक थोरात यांच्याकडे पाहिले जाते तर यावेळी आता महाराष्ट्र आधार सेनेची शाखा ही बीड तालुक्यातील दुसरी शाखा खांडे पारगाव या ठिकाणी स्थापन करण्यात आली महाराष्ट्र आधार सेनेच्या माध्यमातून गोरगरीब जनतेसाठी ना जातीचा धर्माचा आहे एक हात मदतीचा हेच ब्रीदवाक्य घेऊन आज बीड जिल्ह्यामध्ये तरुण महाराष्ट्र आधार सेनेचा झेंडा हाती घेत आहे यामध्ये काल खांडे पारगाव या ठिकाणी शाखा उद्घाटन झाली या शाखा उद्घाटनासाठी सर्व जाती धर्मातील तरुण माता भगिनी मित्र बंधू उपस्थित होते या शाखा च्या माध्यमातून नक्कीच गोरगरिबांना



बीड जिल्ह्यामध्ये आरोग्य क्षेत्र असेल किंवा पोलीस प्रशासन कुठली अडचण असेल तर त्यांना मदत मिळेल असे प्रतिपादन माझी सरपंच अशोक जिजा आमटे यांनी केले यावेळी महाराष्ट्र आधार सेनेच्या दिपक थोरात याच्या हस्ते शाखेचे उद्घाटन करण्यात आले यावेळी सरपंच रामेश्वर आनेराव उपसरपंच अनिल आबा माजी उप सरपच अशोक जिजा आमटे आमटे युवा नेते राजेंद्र आमटे अशोक वाघमारे रवी वाघमारे महाराष्ट्र आधार सेनेचे कार्याध्यक्ष युवा नेते अशोक आबा वाघमारे कपिल जोगदंड ज्येष्ठ नेते दत्ता सौंदरमल उपस्थित होते महाराष्ट्र आधार सेनेची खांडे पारगाव ची कार्यकारणी खालील प्रमाणे करण्यात आली

शाखा अध्यक्ष परशुराम वाघमारे उपाध्यक्ष - अमोल वाघमारे शाखा सचिव-महादेव वाघमारे सदस्य राहुल वाघमारे कृष्णा वाघमारे सतोष वाघमारे सुदाम वाघमारे आयुष्य वाघमारे जय वाघमारे हनुमान वाघमारे क्रिश वाघमारे सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे या ठिकाणी अभिनंदन व शुभेच्छा देऊन सत्कार करण्यात आला पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आले.

# महिला दक्षता समिती प्रमाणे पुरुष दक्षता समिती राज्यात स्थापन करा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुविद्य पत्नी प्रसिद्ध अभिनेत्री अमृता फडणवीस यांना आश्रय सेवा केंद्राच्या वतीने निवेदन - शेख आयेशा

**मुंबई । प्रतिनिधी**

महिलांवर अत्याचार झाला तर त्यांना न्याय देण्यासाठी संपूर्ण राज्यभरात पोलिस स्टेशन अंतर्गत महिला दक्षता समिती कार्यरत आहे. त्यामुळे पीडित महिलांना न्याय मिळतो.मात्र जे पुरुष स्त्रियांच्या त्रासापासून त्रस्त झालेले आहेत त्यांना न्याय देण्यासाठी महाराष्ट्र सरकारने पुरुष दक्षता समिती स्थापन करावी अशी मागणी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आपण करावी अशी मागणी आश्रय सेवा केंद्राच्या अध्यक्षा शेख आयेशा यांनी प्रत्यक्ष भेटून केली आहे.या भेटी मध्ये त्यांनी बऱ्याच वेळ विविध विषयावर सविस्तर सकारात्मक चर्चा केली.

महाराष्ट्रामध्ये महिलांवर अत्याचार होतात.या अत्याचारांना न्याय मिळावा पिढीताना त्रासापासून मुक्तता मिळावी.यासाठी राज्यभरामध्ये पोलीस स्टेशन अंतर्गत महिला दक्षता समिती गठीत करण्यात आलेली आहे. मात्र महाराष्ट्रामध्ये महिलांकडून पुरुषांवर होणारे अत्याचार सुद्धा कमी नाहीत. अशा पीडित पुरुषांना न्याय मिळावा यासाठी राज्यातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत पुरुष दक्षता समिती गठीत करण्यात



यावी.अशी मागणी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पोलीस महासंचालक रश्मी शुक्लाजी यांना निवेदन देऊन आश्रय सेवा केंद्राच्या वतीने केली आहे. या मागणीला न्याय मिळावा यासाठी मुख्यमंत्र्यांकडे साकडे घालावे आणि राज्यातील पीडित पुरुषांना न्याय द्यावा अशी मागणी प्रसिद्ध सुमधुर गायिका, उत्कृष्ठ अभिनेत्री तथा समाजसेविका अमृता फडणवीस यांना प्रत्यक्ष भेटून केली असल्याचे पत्रकार तथा आश्रय सेवा केंद्राच्या अध्यक्ष शेख आयेशा यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

### अमृता फडणवीस यांची नम्रता अमृताहूनही गोड जाणवली...

**महाराष्ट्राचे लोकप्रिय आणि चाणाक्ष मुख्यमंत्री म्हणून ज्यांची जगभर ख्याती आहे अशा देवाभाऊंची सुविध पत्नी प्रसिद्ध अभिनेत्री,सुमधुर गायिका,सामाजिक कार्यकर्त्या अमृता फडणवीस यांनी केवळ भ्रमणध्वनीवर झालेल्या मैत्रीला जागून प्रत्यक्ष मुंबईत भेटीसाठी आमंत्रित केले. प्रत्यक्ष भेटी दरम्यान त्यांनी मोठ्या अज्बीने म्हणाल्या,बीड वरून मला खास भेटण्यासाठी आलेल्या त्या आयेशा कुठे आहेत.असे आपल्या सिक्युरिटी गार्डला विचारत त्यांनी सर्व प्रोटोकॉल बाजूला ठेवून प्रत्यक्ष भेट घेतली. विविध विषयावर बाजूला खुर्ची टाकून सविस्तर बराच वेळ मनमोकळ्या गप्पा मारल्या.आणि पुन्हा आपण भेटत राहू. तुमच्याशी भेटून गप्पा मारू खूप चांगले वाटले. अशी भावना व्यक्त केली.त्यांच्यामध्ये असलेली माणुसकी, आपलेपणा हा अमृताहुनी गोड जाणवला. भेटीचा हा क्षण अविस्मरणीय ठरला.**

# माविम अंतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे जिल्हाधिकारी यांना निवेदन

**मोलगी । रविंद्र वळवी**

नंदुरबार जिल्ह्यातील महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत स्थापित करण्यात आलेल्या सीएमआरसी कंत्राटी कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध समस्यांचे पत्र काल नंदुरबार जिल्हाधिकारी यांना दिले. दिनांक ३०/०७/२०२५ रोजी नंदुरबार जिल्ह्यात महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत एकूण आठ लोकसंचालित साधन केंद्र स्थापन झालेले आहेत . सर्व लोकसंचालित साधन केंद्रे हे स्वबळावर सुरू आहे. लोकसंचलित साधन केंद्रातील कर्मचारी गेल्या दोन वर्षापासून असहकार आंदोलन सुरू असून, जिल्ह्यातील शासन प्रचलित महिला सक्षमीकरणासंबंधीचे ग्रामीण व शहर स्तरावरील कार्यक्रम उपक्रम व योजनांचे अहोरात्र काम केंद्रातील व्यवस्थापक लेखापाल सहयोगिनी सीआरपी या कर्मचाऱ्यांमार्फत कामे करून घेत असताना, महिला आर्थिक विकास महामंडळाकडून या कर्मचाऱ्यांना मानधनाची कोणतीही तरतूद नाही वा योग्य तो मानधन दिला जात नाही. महिला सक्षमीकरणा संबंधीचे अहोरात्र काम करून या कर्मचाऱ्यांना लोकसंचालित साधन केंद्राच्या अशाश्वत अशा उत्पन्नातून मानधन करण्याची तरतूद असल्याने ह्या कर्मचाऱ्यांचे वेळेत मानधन होत नाही किंवा मानधन होणार याची काहीच शाश्वती नाही.म्हणून सर्व कंत्राटी कर्मचाऱ्या च्या संघटनेद्वारे जिल्हाधिकारी नंदुरबार यांना विविध मागणीचे निवेदन देण्यात आले त्या निवेदनात खालील प्रमुख मागण्याची मागणी करण्यात आली.

१) लोकसंचालित साधन केंद्रातील कर्मचाऱ्यांना मासिक मानधन व प्रशासकीय खर्चा करिता २५ लक्ष रुपये निधी सर्व लोकसंचलीत साधन केंद्रांना उपलब्ध करून द्यावेत.

२) सी आर पी कंसात समुदाय साधन व्यक्ती यांना उमेद सीआरपी प्रमाणे ६०००/ रुपये मासिक मानधन करिता तरतूद देण्यात यावे.

३) माविन स्थापित प्रत्येक गटांना उमेद प्रमाणे ३००००/ रुपये आर एफ फिरता निधी उपलब्ध करून देण्यात यावे.

४) माविम स्थापित प्रत्येक गटाला उमेद प्रमाणे ७% व्याजदराने बँक कर्ज उपलब्ध करून देण्यात यावे.

अश्या स्वरूपाचे निवेदन सर्व लोकसंचलित साधन केंद्र, व्यवस्थापक,लेखापाल, सहयोगिनी, प्रेरक,द्वारे देण्यात आले .



# बालाघाटच्या रांगांतून सरळ क्राईम ब्रँचमध्ये उतरलेली शेतकऱ्याची वाघीण

## रत्नकन्येला 'समाजरत्न' सन्मान ;अश्विनी तिडके यांचा पराक्रम उजळला

**बीड | लोकपत्रकार भांगे**

बीड जिल्ह्याच्या उंचसखल भागात वसलेला बालाघाट भाग... डोंगराळ, दुर्गम, कठीण... पण या खडतर भागात जन्म घेऊन आपल्या हिमतीने, कष्टाने आणि जिद्दीने एका साध्या घरातून बाहेर पडलेली ही कन्या – अश्विनी तिडके. बालाघाटच्या डोंगररांगांमध्ये लपलेली ही 'रत्नकन्या' आता महाराष्ट्र पोलीस खात्याच्या क्राईम ब्रँचमधील लखलखीत नाव ठरली आहे.एका बाजूला गुन्हेगारांचा दबदबा, तर दुसऱ्या बाजूला कायद्याच्या चौकटीत उभं राहून धाडसाने निर्णय घेणारी एक महिला... झाशीच्या राणीच्या आठवणी जागवणारी, शत्रूंशी दोन हात करणारी आणि अन्यायाविरोधात रणकंदन करणारी ही अश्विनी आज संपूर्ण वंजारी समाजासाठी गौरवाची बाब ठरली आहे.

पोलिस खात्याच्या कठीण क्षेत्रात, विशेषतः गुन्हेगारी अन्वेषणाच्या विभागात एक महिला अधिकारी म्हणून काम करताना तिने ज्या पद्धतीने गुन्हेगारी टोळ्यांवर कारवाया केल्या, गुन्हेगारांचे जाळे फोडले, ते केवळ कर्तव्य नव्हतं, तर समाजासाठी एक सुरक्षा कवच होतं.या सर्व कार्याची, तिच्या निस्वार्थ सेवेची, डोंगरमातीतून आलेल्या तिच्या जिद्दीची आणि कठोर मेहनतीची दखल घेत यंदाचा 'वंजारी समाजरत्न २०२५' हा प्रतिष्ठेचा पुरस्कार अश्विनी तिडके यांना जाहीर करण्यात आला आहे.हा पुरस्कार १० ऑगस्ट २०२५ रोजी नाशिकमध्ये होणाऱ्या एका भव्य सोहळ्यात देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्था महाराष्ट्र राज्य व क्रांतीवीर वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक संस्था यांच्या वतीने करण्यात आले आहे.या कार्यक्रमाला माजी मंत्री पंकजा मुंडे, भाजप नेते धनंजय मुंडे, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, तसेच विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित व्यक्तींची उपस्थिती लाभणार आहे.अश्विनी तिडके यांचं कार्य हे केवळ पोलिसी चौकटीत मर्यादित नाही. त्या महिलांच्या सुरक्षेसाठी नेहमी तत्पर असतात, सामाजिक उपक्रमात सहभाग घेतात आणि गरजूंना मदतीचा हात पुढे करतात. अशा या धडाडीच्या अधिकाऱ्याला पुरस्काराच्या माध्यमातून संपूर्ण समाजाकडून दिला जाणारा सलाम म्हणजेच या सन्मानाचं मूळ कारण.

बालाघाटच्या रांगात उगम पावलेली, कठीण डोंगराळ वाटा पार करत उभी राहिलेली ही कन्या, आज प्रत्येक शाळकरी मुलीला, प्रत्येक तरुणीला सांगते डोंगर असो की अडथळे, जर झाशीचं रक्त अंगात असेल तर वाट काढावी लागते!



# कला क्रीडा विश्व समितीच्या वतीने घेण्यात आलेली गायन स्पर्धा संपन्न

**केज | प्रतिनिधी**




दिनांक ३१ जुलै रोजी स्वर्गीय मोहम्मद रफी यांच्या पुण्यतिथी निमित्त केज येथे कला क्रीडा विश्वास समितीच्या वतीने घेण्यात आलेली मोहम्मद रफी यांच्या गीत गायन स्पर्धा संपन्न झाली या स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्षा सौ सीता ताई बनसोड, भाई मोहन गुंड, शिवाजी दादा ठोंबरे ,शाहीर तुकाराम ठोंबरे, ज्येष्ठ समाजसेवक हनुमंत भोसले ,आर पी आय तालुका अध्यक्ष दीपक कांबळे, या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून लाभलेले लातूर येथील चंद्रशेखर पारशेट्टी,बीड येथील सुरेश थोरात, सर सचिन राऊत सर, पुरोगामी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष रंजीत घाडगे, पत्रकार चंद्रकांत पाटील, तात्या गवळी, वसंत बप्पा सोनवणे, दिनकर जाधव, अमोल सावंत, या मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून स्पर्धेला सुरुवात झाली स्पर्धेला नागरिकांतून व स्पर्धकातून मोठा प्रतिसाद होता या स्पर्धेसाठी बऱ्याच ठिकाणाहून स्पर्धक आले होते तर या स्पर्धेत होणारे गीत ऐकण्याकरिता भरपूर संख्यांनी रसिकश्रोते उपस्थित ही स्पर्धा स्त्री व पुरुष गटामध्ये घेण्यात आली. यामध्ये एकूण ५४ स्पर्धक होते १७ महिला व३७ पुरुष यांनी सहभाग घेतला होता पुरुष स्पर्धकांनी मोहम्मद रफी यांचे गीत गाऊन व महिलांनी लता मंगेशकर व इतर गायिकेचे गाणे गाऊन रसिकांना मंत्रमुग्ध केले या स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक लातूर येथील किशोर कांबळे, द्वितीय बक्षीस महेश, तोष्णीवाल तृतीय बक्षीस सुदर्शन शिंदे, व उत्तेजनार्थ जनार्दन वडमारे ,यांनी पटकावले व महिलां मध्ये प्रथम बक्षीस संभाजीनगर येथील दिपाली हरणे, द्वितीय बक्षीस ललिता लांडगे, तृतीय बक्षीस सुरेखा थोटे ,व उत्तेजनार्थ दीक्षा कांबळे, यांनी पटकावले या कार्यक्रमाची प्रस्तावना कला क्रीडा विश्वास समितीचे तालुका अध्यक्ष अनिल वैरागे यांनी केली व आभार उपाध्यक्ष मुनीर कुरेशी यांनी मानले. या स्पर्धेसाठी कला क्रीडा विश्व समितीचे सचिव सचिन लांडगे ,बलभीम मस्के, शिवमुर्ती हजारे, कल्याण मस्के, दिलीप खाडे, अमोल सरवदे, ज्ञानेश्वर लांब, सिंधू मुळे, अनिता कसबे, छबू अंधारे ,या पदाधिकाऱ्यांनी मोठे परिश्रम घेतले.

## तळोदा येथे महसूल दिन उत्साहात साजरा

# आमदार राजेश पाडवी यांच्या हस्ते महसूल सप्ताहाचा शुभारंभ

**नंदुरबार | दिपक गोसावी.**



तळोदा येथील महसूल विभागाने ०१ ऑगस्ट २०२५ रोजी महसूल दिन उत्साहात साजरा केला. यावेळी आमदार राजेश पाडवी यांच्या हस्ते महसूल सप्ताहाचा शुभारंभ करण्यात आला. तहसीलदार दिपक धिवरे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला.यावेळी गटविकास अधिकारी राजू किरवे, नायब तहसीलदार महसूल विजय ससे, निवासी नायब तहसीलदार निशा वसावे, तसेच विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि जननायक बिरसा मुंडा, लोकमान्य टिळक, व अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून झाली.कार्यक्रमात प्रास्ताविक सहायक महसूल अधिकारी वर्षा माळसकर यांनी केले, तर सूत्रसंचालन मंडळ अधिकारी तुषार साळुंखे यांनी केले.महसूल सप्ताहादरम्यान शासकीय जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल करणे, पाणंद व शीव रस्त्यांची मोजणी, छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान राबवणे, तसेच विविध दाखले व प्रमाणपत्रे वाटप करणे अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी कर्तव्यदक्ष अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला आणि प्रातिनिधिक स्वरूपात लाभार्थ्यांना रेशनकार्ड, जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र आणि ७/१२ उताऱ्यांचे वाटप करण्यात आले.ग्राम महसूल अधिकारी भरत बारी आणि राजश्री पाडवी यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी मान्यवरांनी महसूल विभागाच्या कामाचे कौतुक केले.

# अग्नीपंख फौंडेशन तर्फे विद्यार्थ्यांचा सन्मान

**श्रीगोंदा | गणेश गाडेकर**



अग्नीपंख फौंडेशनने श्रीगोंदा येथे आयोजीत केलेल्या विद्यार्थी प्रेरणा उत्सवात राष्ट्रीय जलतरणपटू राजेश्री गुगळे एम पी एस सी, एन एम एम एस व शासकीय शिष्यवृत्ती परीक्षा इस्त्रो सहलीसाठी निवड नवोदय प्रवेश पुर्व परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान केला. हा सन्मान जेष्ठ साहित्यिक डॉ संजय कळमकर गटविकास अधिकारी राणी फराटे गटशिक्षणाधिकारी कुसुमकुमारी अनिल शिंदे सत्यजित मच्छिंद्र यांचे हस्ते करण्यात आला या सोहळ्यात राष्ट्रीय जलतरणपटू राजेश्री गुगळे (आढळगाव), धाडसी कन्या अनुष्का फराटे (मांडवगण) स्पर्धा परिक्षेत यश संपादन करणारे पुजा लगड संदीप भापकर (कोळगाव) श्रेयस खोमणे लोणीव्यंकनाथ भक्ती वाणी (ढोरजे) प्राजक्ता कोंथिबीरे उमेश औटी तसेच २३५ विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच चैताली श्रीराम (कोकणगाव) हिला सायकल, राखी कुचेकर काष्टी हीला स्पर्धा परिक्षेची पुस्तके तर अस्मिता लगड (तांदळी हीला) हिला अकरावीचे शालेय साहित्य व गणवेश भेट देण्यात आले. संजय कळमकर म्हणाले कि विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले कला गुण ओळखून त्यांना करिअर करण्यासाठी संधी दिली पाहिजे शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी पालक व शिक्षक यांनी एकत्रीत प्रयत्न केले तर निश्चितच चांगले रिझल्ट भविष्यात येतील. अग्नीपंख फौंडेशन हे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे साठी शाळा सुधारणा देणेसाठी निस्वार्थ भावनेने योगदान देत आहे. या फौंडेशनला मदत केली तर मदतीची चळवळ व्यापक होऊ शकते. हा सन्मान जेष्ठ साहित्यिक या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी अनिल शिंदे होते गटविकास अधिकारी राणी फराटे म्हणाल्या की अग्नीपंख फौंडेशन शाळा विद्यार्थी शिक्षक यांच्या दृष्टीने चांगले काम करीत आहे या कौतुकाच्या थापेमुळे श्रीगोंद्यातील शैक्षणिक गुणवत्ता वाढण्यास मदत होत आहे. प्रास्ताविक राजकुमार इथापे यांनी केले यावेळी गटशिक्षणाधिकारी राजेश्री गुगळे कुसुमकुमारी कानडी अनिल शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले यावेळी मोहनराव आढाव हौसराव भोस प्रशांत गोरे अकुंश घाडगे सत्यजित मच्छिंद्र भाऊसाहेब वाघ नवनाथ दरेकर नवनाथ खामकर निलेश मुनोत रमेश सांळुके सुरज तुपे अमोल गव्हाणे मयुर गोरखे शिवदास शिंदे दादासाहेब कोल्हे किसन वऱ्हाडे अमोल गव्हाणे भावना मोहीते प्रमिला गावडे विजया लंके उपस्थित होते सुत्रसंचलन साक्षी पाचपुते व सहदेव खामकर यांनी केले तर आभार प्रा संजय लाकूडझोडे यांनी मानले.

# निसर्गरम्य तिनसमाळ:संस्कृतीचं जतन आणि पर्यटनाची संधी

**मोलगी | रविंद्र वळवी**



सातपुड्याच्या कुशीत वसलेलं तिनसमाळ हे केवळ एक पर्यटन स्थळ नाही, तर आदिवासी संस्कृतीचं आणि नैसर्गिक सौंदर्याचं प्रतीक आहे. धडगाव तालुक्यातील हे गाव 'सातपुड्याचं काश्मीर' म्हणून ओळखलं जातं. येथील 'थ्री स्टेट व्ह्यू पॉइंट' वरून गुजरात आणि मध्यप्रदेशचा निसर्गरम्य परिसर दिसतो, ज्यामुळे पर्यटक सेल्फी आणि फोटो काढण्यासाठी गर्दी करतात. इथून दिसणारी अथांग नर्मदा नदी, उंच डोंगर आणि दाट धुकं पर्यटकांना स्वर्गात असल्याचा अनुभव देतात.

गावाच्या मध्यभागी फिरताना आदिवासींची जीवनशैली, नैसर्गिक शेती आणि पशुपालन जवळून अनुभवता येतं. तिनसमाळमध्ये असलेलं आदिवासी संग्रहालय पावरा आणि भिल समुदायाची समृद्ध परंपरा दर्शवतं. स्थानिक पारंपरिक वाद्य, नृत्य आणि शेकोटीचा अनुभव घेण्यासाठी पर्यटक रात्रीचा मुक्काम करतात. यातून स्थानिकांना रोजगारही मिळतो.

मात्र, पर्यटनामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडू नये म्हणून स्थानिक रहिवासी लक्ष्मण मोगरा पावरा पर्यटन विकासाऐवजी सांस्कृतिक गावाकडे लक्ष देण्यावर भर देत आहेत. तसेच, तिनसमाळ गाव एक ऐतिहासिक आणि सांस्कृतिक केंद्र असल्याचं स्थानिक जाणकार गोण्या पावरा सांगतात.

गावाला जोडणाऱ्या रस्त्यांची दुरवस्था आणि विजेची अनियमितता यांसारख्या समस्या आजही कायम आहेत. या भौतिक सुविधांचा विकास झाल्यास पर्यटनाला चालना मिळेल आणि स्थानिक संस्कृतीचे जतन करत रोजगारनिर्मितीही शक्य होईल.

# इच्छापूर्ती जागृत मारुती श्रीक्षेत्र मलकापूर येथे श्रावण शनिवार निमित्त भाविकांची अलोट गर्दी

## महावितरण कार्यालय शाखा कुंडलवाडीच्या वतीने भव्य महाप्रसाद

**नांदेड | हनुमंत चंदनकर**



नांदेडच्या बिलोली तालुक्यातील मलकापूर येथील श्रीक्षेत्र इच्छापूर्ती जागृत मारुतीच्या दर्शनासाठी श्रावणातील दुसऱ्या शनिवार निमित्य भाविकांनी दर्शनासाठी अलोट गर्दी केली इच्छापूर्ती जागृत मारुती दर्शनासाठी वर्षभर लाखो भाविक तेलंगणा आंध्रा कर्नाटक महाराष्ट्र अनेक राज्यातून लोक दर्शनासाठी येतात इच्छापूर्ती जागृत मारुती असल्याने अनेकांचे मनोगत पूर्ण होतात असा भाविकांचा विश्वास आहे वर्षभर दर शनिवारी महाप्रसाद केला जातो लाखो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतात हनुमान जन्मोत्सव श्रावण महोत्सव श्रीराम जन्मोत्सव आधी उत्सव आनंदाने साजरे केले जातात आज दिनांक दोन ऑगस्ट रोजी श्रावणाच्या दुसऱ्या शनिवार निमित्य महावितरण स्टॉप च्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलं होत पूजेचे यजमान गट्टूवार साहेब ( एम एस ई बी सेल) व देवनपल्ले यांच्या शुभहस्ते अभिषेक आरती करण्यात आली माहेश्वर मूर्ती पुरोहित दत्तात्रेय महाराज स्वामी पिंपळगावकर विविध पूजा अर्चना केली येथील परिसर भाविकांच्या राहण्यासाठी भक्तनिवास स्वच्छालय पिण्याच्या पाण्याच्या टाक्या यासह मंदिर परिसरात परसबाग गार्डनची व्यवस्था असावी असे मनोगत हनुमान भक्त मोहन गंगोणे पत्रकाराशी बोलताना म्हणाले येथील सेवेसाठी सदैव तत्पर असलेले हनुमान भक्त रमेश मदनुरवार वेंकट देसाई नारायण गुरुजी मारुती जायवार पोशट्टी इज्जमवार, पुंडलिक होणवडजकर विठ्ठल बिरंगवाड अशोक अवधाने राजू संगमकर बजरंग आचारी सदू आचारी राजू आचारी साईनाथ मायेवार लक्ष्मण इंद्रोड गंगाधर बिलोलीकर व्यंकटी यासह परिसरातील भक्त येऊन येथे सेवा करतात.

# नेताजी सुभाष चंद्र बोस कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून लोकमान्य टिळक पुण्यतिथी

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरा

**नादेड | हनुमंत चंदनकर**




तालुक्यातील सावळी येथे लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. नेताजी सुभाषचंद्र बोस कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याकडून लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे यांची जयंतीचा कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमाचे आयोजन नेताजी सुभाषचंद्र बोस कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य एम. आर. मुळे, केंद्र संयोजक डॉ. राठोड व कार्यक्रम अधिकारी प्रा. राठोड ए. डी. यांच्या मार्गदर्शनाखाली, मरखेल येथील कृषी महाविद्यालयातील कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थ्यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सावळीचे सहशिक्षक गोविंदवार चंद्रकांत सर , शिक्षक पाळेकर गंगाधर सर व अन्य उपस्थित शिक्षकांच्या हस्ते करण्यात आले. कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांतर्फे मुख्याध्यापक व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. नेताजी सुभाष चंद्र बोस कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी माधव पाळते, समीर शेख, नरसिंगोजू पृथ्वी साई, शुभम सोनकांबळे, नागेश पाटील, अभिजात वाघ, प्रियश बोरकर आणि तनिष्क तरले यांनी कार्यक्रम आयोजित करण्यात आला. तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊ वाटपाचा कार्यक्रमही पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागेश पाटील यांनी पार पाडले. व तसेच शुभम सोनकांबळे यांनी आभार व्यक्त केले

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077